म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. 22


REFBK-0002640

ग्रं. सं. ठाणं

# मुंबई इलाखा

[illegible]

[illegible]

लेखक,

केशव रामचंद्र कुलकर्णी

हेडमास्तर, मराठी शाळा नं. ३,

बेळगांव.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

मार्च १९२४.

किंमत ३ आणे.

मुद्रकः—

शामराव संताजीराव भोंसले **श्रीशिवाजी** प्रिंटिंग प्रेस बेळगांव.

प्रकाशकः—

केशव रामचंद्र कुलकर्णी हेड्मास्तर मराठी शाळा नं. ३ बेळगांव.

खडेबाजार घर नं. ३१५६.

# आपला मुंबई इलाखा.

(इयत्ता चौथी करितां).

लेखक,

केशव रामचंद्र कुलकर्णी

हेड्मास्तर, मराठी शाळा नं. ३,

बेळगांव.

REFBK-0002640

मार्च १९२४.

किंमत ३ आणे.

# लेखकाचे दोन शब्द.

चौथ्या इयत्तेस " मुंबई इलाख्याची सामान्य माहिती व मराठा जि
विशेष माहिती ", असा भूगोल विषय आहे. प्रस्तुत पुस्तकांत
विषयाची वर्गीकरण पद्धतीनें माहिती दिली आहे. परीक्षेच्या
ांच्या दृष्टीनें तिचा उपयोग होईल, अशी आशा आहे.
विषय नकाशाच्या साह्यानें शिकविल्यास जलद तयार होतो व मनांत चांगला ठ
याकरितां प्रस्तुत पुस्तकाचा उपयोग करितांना नकाशाचें साहाय्य घ्यावें. अगोदर
माहिती दिली असून सामान्य माहिती नंतर दिली आहे. शिक्षकांनीं जरूर तर
माहिती अगोदर शिकवावी. ध्यानांत ठेवण्याची जरूर नाहीं अशी माहिती
नाहीं. शेवटीं विल्हेवारीनें व्याख्या दिल्या आहेत. व स्थलांच्या नांवाची
दिली आहे. तिचाही उपयोग करितां येईल.

प्रस्तुत पुस्तकाबद्दल शिक्षकांनीं आपला अभिप्राय कळवावा. व जरूर त्या
कळवाव्या अशी विनंति आहे.

**केशव रामचंद्र कुलकर्णी**
हेड्मास्तर, मराठी शाळा नं.
**बेळगांव.**

# लेखकाचे दोन शब्द.

चौथ्या इयत्तेस " मुंबई इलाख्याची सामान्य माहिती व मराठी जि[illegible] विशेष माहिती ". असा भूगोल विषय आहे. प्रस्तुत पुस्तकांत विषयाची वर्गीकरण पद्धतीनें माहिती दिली आ[illegible]. परीक्षेच्या [illegible]गाच्या दृष्टीनें तिचा उपयोग होईल, अशी आशा आहे. विषय नकाशाच्या साह्यानें शिकविल्यास जल्द तयार होतो व मनां[illegible] चांगला ठ[illegible] याकरितां प्रस्तुत पुस्तकाचा उपयोग करितांना नकाशाचें साहाय्य घ्यावें. अगोदर[illegible] माहिती दिली असून सामान्य माहिती नंतर दिली आहे. शिक्षकांनीं जरूर तर [illegible] माहिती अगोदर शिकवावी. ध्यानांत ठेवण्याची जरूर नाहीं अशी माहिती [illegible] नाहीं. शेवटीं विल्हेवारीनें व्याख्या दिल्या आहेत. व स्थलांच्या नांवाची [illegible] दिली आहे. तिचाही उपयोग करितां येईल.

प्रस्तुत पुस्तकाबद्दल शिक्षकांनीं आपला अभिप्राय कळवावा. व जरूर [illegible] कळवाव्या अशी विनंति आहे.

**केशव रामचंद्र कुलकर्णी**
हेड्मास्तर, मराठी शाळा नं. [illegible]
**बेळगांव.**

# आपला मुंबई इलाखा.

१ **मुंबई इलाखाः**—हिंदुस्थान द्वीपकल्पाच्या पश्चिमेकडील अरुंद पट्टीस **मुंबई इलाखा** असें ह्मणतात.

२ **स्वाभाविक विभागः**—सिंध, कच्छ, गुजराथ, महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, कोंकण.

३ **राजकीय विभाग व मुख्य शहरेंः**—सिंधप्रांत(कराची), **उत्तरभाग** (अहमदाबाद), **मध्यभाग** (पुणें), **दक्षिणभाग** (बेळगांव), **मुंबई बेट.**

४ **संस्थानांचे विभागः**—कच्छ (भूज), **काठेवाड-एजन्सीज** (राजकोट), **गुजराथएजन्सीज**, महाराष्ट्रांतील जहागिरी, दक्षिणमहाराष्ट्रांतील जहागिरी (कोल्हापूर).

५ **जिल्हेः**—

१ **सिंधप्रांतांतः**—अपरसिंधफ्रँटियर (जाकोबाबाद), शिकारपूर, लारखाना, हैदराबाद, कराची, थर आणि पारकर (उमरकोट), नवाबशाह.

२ **उत्तरभागांतः**—(गुजराथी):—अहमदाबाद, खेडा, पंचमहाल, भडोच, सुरत, [मराठी] ठाणें.

३ **मध्यभागांतः**—पश्चिमखानदेश (धुळें), पूर्वखानदेश [जळगांव], नाशीक, पुणें, अहमदनगर, सातारा, सोलापूर.

४ **दक्षिणभागांतः**—बेळगांव. धारवाड. कारवार. विजापूर कुलाबा. रत्नागिरी.

५ **कोंकणांतील मराठी जिल्हे**—ठाणें, कुलाबा, रत्नागिरी.

सं. ८१ ... २५८०

६ **कानडी जिल्हे**:—बेळगांव. धारवाड. कारवार, विजापूर.

७ **उत्तरभाग मराठी जिल्हा**—ठाणें.

८ **दक्षिणभाग मराठी जिल्हे**—कुलाबा. रत्नागिरी.

९ **मराठी जिल्हे**—मध्यभाग, व ठाणें, कुलाबा, रत्नागिरी.

## ६ शहरें व गांवें ब्रिटिश जिल्ह्यांतीलः—

१ **सिंधप्रांतः**— **कराची**-मुख्य शहर व नं. २ बंदर. **हैदराबाद**-सिंधूच्याकांठीं, कापड, गालिचे. **सक्करः**— सिंधूकांठीं, मोठें धरण, बोलन रस्त्यावर. **जाकोबाबादः**— कडक उन्हाळा, फौजेची छावणी. **उमरकोटः**—अकबराचें जन्मस्थान. **मियानीः**— रणभूमि, सर चार्लस नेपियर यानें सिंधच्या अमिराचा पराभव केला.

२ **गुजराथ**:--**अहमदाबादः**--मुख्य शहर, गिरण्या, कापड, आगपेट्या, किनखाप. **भडोच**:--गिरण्या. **सुरत**:--१६१२ त इंग्लिशांची वखार होती. जर, किनखाप. **खारा घोडा**:--मीठ.

३ **पश्चिम खानदेशः**-- **धुळें**:-- मुख्य शहर, गिरण्या. **तळोदें**:-- लांकडाचा व्यापार. **शिंदखेडें**:--लुकजी जाधवरावांचें गांव.

४ **पूर्व खानदेश**:-- **जळगांव**:-- जिल्ह्याचें ठाणें, गिरण्या. **अंमळनेर**:—गिरण्या. **चाळिसगांव**:— धुळें रेल्वे फांटा. **भुसावळः**- जंक्शन स्टेशन, रेल्वे कारखाना. **अजिंठा**: - कोरींवलेणीं. **फैजपूर**:- पासोड्या.

५ **नाशीक**:-- **नाशीक**:--जिल्ह्याचें ठाणें, क्षेत्र, गोदावरीकांठ, धातूंचीं भांडीं. **भगूरः**—गोरी फौज. **मनमाड**:-- जंक्शन स्टेशन. **त्र्यंबकेश्वर**:--क्षेत्र, गोदावरी उगमस्थान. **येवलें**:--रेशीम, जर, कद, पितांबर. **इगतपुरी**:--मोठें स्टेशन, थंड हवा. **मालेगांव**:--किल्ला.

६ **पुणें**:- **पुणें**:--जिल्ह्याचें व भागाचें ठाणें, पेशव्यांची राजधानी, रेशीम व कलाबतूचें काम, इलाख्याचीं ऑफिसें, गणेशखिंडींत गव्हर्नर साहेबांचा बंगला, अनेक शाळा, हायस्कुलें, कॉलेजें. **खडक वासलें**:--येथें धरण असून पुण्यास पाण्याचा पुरवठा नळानें केला आहे. **आळंदी**:–ज्ञानदेवाची समाधि. **कार्लें**:–कोरींव लेणीं. **कोरेगांव**:--रणभूमि, जयस्तंभ. **खडकी, घोरपडी, वानवडी**:—फौजेच्या छावण्या. **चिंचवड**:--गणपतीचें स्थान. **जुन्नर**:--सुडाचे कागद, लुगडीं, **जेजुरी**:- खंडोबाचें देवस्थान. **तळेगांव**:--कांचकारखाना. **देहू**:--तुकारामाची समाधि. इंद्रायणी कांठ. **निरानरसिंगपूर**:--निरा भीमा संगम, नरसिंहाचें स्थान. **बारामती**:--रेशमी कापड, मोरोपंतांचें गांव. **भीमाशंकर**:--भीमेचा उगम, देवस्थान. **लोणावळें खंडाळें**:—थंड हवेचीं ठिकाणें. **सिंहगड**:-- किल्ला. **शिवनेरी**:-- किल्ला, शिवाजीचें जन्मस्थान १६३० **हिंगणें**:—स्त्रियांचें कॉलेज.

७ **अहमदनगर**:—जिल्ह्याचें ठाणें, किल्ला, गिरण्या, चांदबिबीचा महाल. **कर्जत**:--धान्य व्यापार. **कोपरगांव**:--पेशव्यांचा वाडा. **खर्डें**:--किल्ला, रणभूमि-( निजाम मराठे १७९५). **पुणतांबें**:-गोदावरी कांठ, क्षेत्र, चांगदेव समाधि. **श्रीगोंदें**:--शिंद्यांचा वाडा. शेखमहंमदाचें गांव. उत्तम घोडे. **संगमनेर**:--अनंतफंदीचें गांव. लुगडीं, पितळीं भांडीं.

८ **सातारा**:—जिल्ह्याचें ठाणें. मराठ्यांची राजधानी, लोखंडी नांगर. **अजिमतारा**:--किल्ला. **औदुंबर**:–कृष्णाकांठ, दत्ताचें स्थान. **कऱ्हाड**:--कृष्णाकांठ, मनोरे. **तासगांव**:--गणपतीचें स्थान, गोपूर. **पांचगणी**:-थंड हवा. **महाबळेश्वर शहर**:–थंड हवा. **धोम**:--नरसिंहस्थान. **क्षेत्र महाबळेश्वर**:-कृष्णा वेण्णा उगम. **वांई**:--कृष्णाकांठ, क्षेत्र. **सज्जनगड**:--परळीचा किल्ला, रामदासांची समाधि.

९ **सोलापूर**:—जिल्ह्याचें ठाणें, गिरण्या, कापड, लुगडीं, जैनांचीं देवालयें. **पंढरपूर**:--भीमाकांठ, विठोबाचें स्थान, जत्रा. **बार्शी**:--भगवंताचें स्थान. देवालयें.

१० **ठाणें**:—जिल्ह्याचें ठाणें, रेशमीं कापड, ठाणा क्लाथ, पीतांबर. **आगाशी**:--सुकेळीं. **कल्याण**:–जंक्शन स्टेशन, व्यापार. **कानेरी**:--कोरींव लेणीं. **निर्मळ**:--क्षेत्र. **भिवंडी**:--लुगडीं, खण, पीतांबर. **वज्रेश्वरी**:--वज्र बाईचें स्थान, उष्णोदकाचें कुंड. **वसई**:--किल्ला. **वांद्रें**:--कसाईखाना.

११ **कुलाबा**:– **अलिबाग**–जिल्ह्याचें ठाणें, बंदर, किल्ला, दीपस्तंभ, आंग्र्याची राजधानी, **घारापुरी**:–बेट, कोरींवलेणीं, **पनवेल**:--औषधी कारखाना. **प्रतापगड**:–भवानीचें देऊळ, किल्ला. **पेण, महाड**–भाताचा व्यापार. **माथेरान**:–थंड हवा. **रायगड**:--किल्ला, शिवाजीचें समाधिस्थान. **रेवदंडा**:--बंदर.

१२ **रत्नागिरी**:–जिल्ह्याचें ठाणें, शिल्पशाळा, लांकडीसामान **चिपळूण**:—व्यापार. **दापोली**: नामी हवा. **परशराम**:–क्षेत्र. **मालवण**:-बंदर, व्यापार. **राजापूर**:-बंदर, व्यापार, गंगास्थान, उन्हाळें, दोन तीन वर्षांनीं आकस्मिक झरा वाहतो. **विजयदुर्ग**:-किल्ला, बंदर, गव्याच्या शिंगावरील नकशी. **वेंगुर्लें**:-बंदर. व्यापार, **वेळास**:-नाना-फडणीसांची जन्मभूमि **सिंधुदुर्ग**:-किल्ला. **हर्णै**:-बंदर.

१३ **बेळगांव**:—जिल्ह्याचें ठाणें, किल्ला, थंड हवा. लष्करी छावणी. **अथणी**:-गिरण्या, व्यापार. **गोकाक**:-घटप्रभेचा धबधबा, गिरणी, लांकडी रंगीत सामान, **चिकोडी**:-कापड, पानमळे, **निपाणी** व्यापार, तंबाकू, गुळ. **संकेश्वर**:-शंकराचार्यांचा मठ, व्यापार, मिरची. **सौंदत्ती**:-यल्लमाचें देऊळ.

१४ **धारवाड**:-जिल्ह्याचें ठाणें, खण. तूप. **हुबळी**, **गदग**, मोठें शहर, जंक्शन स्टेशन, रेल्वे कारखाना.

१५ **कारवार**:-जिल्ह्याचें ठाणें, बंदर. **गोकर्णमहाबळेश्वर** क्षेत्र. **कुमठें**:-बंदर. **होनावर**:-बंदर. **सिरसी**:-वेलदोडे, सुपारी, मिरीं, चंदन.

१६ **विजापूर**:-जिल्ह्याचें ठाणें. आदिलशाहीची राजधानी, इतिहासप्रसिद्ध इमारती—गोलघुमट, इब्राहिमरोजा, असारमहाल. मेहेतरमहाल. **इलकल**:-लुगडीं. बदामी किल्ला, लेणीं. **बागलकोट**:-गिरण्या. **तालीकोट**:-रणभूमि. गालिचे, सत्रंज्या.

७ **शहरें व गांवें**:—एतद्देशीय संस्थानांतील:—

१ **कच्छप्रांत**:-**भूज** राजधानी, **मांडवी**:-बंदर, दीपगृह.

२ **गुजराथ—राजकोट**:-राजकुमार कॉलेज, रेसिडेन्सी, उत्तम हवा. **भावनगर**:—कापूस. **द्वारका**:—कृष्णाची राजधानी, क्षेत्र. **पोरबंदर**:--इमारती दगड. **वेरावळ**:--बंदर. **सोमनाथ**:--देवस्थान, हें महंमुदानें १०२४ त लुटलें. **जाफराबाद**:--उत्तम म्हशी. **जुनागड**:—व्यापार.

३ **खैरपूर**:-[ सिंध प्रांतांत ].

४ **गुजराथ एजन्सी**:—**दांटा**:-संगमरवरी दगड. **राजपिंपळा**:—मौल्यवान् दगड. **बडोदें**:—मोठें शहर, गायकवाडांची राजधानी, रेसिडेन्सी. राजवाडे, संग्रहालयें, बागा. **भोर संस्थान**-**तोरणा**:- किल्ला. **औंध संस्थान**:- **किर्लोस्करवाडी**:- लोखंडी कारखाना. **जंजीरा-मुरूड** मुख्य शहर. **कोल्हापूर**:- क्षेत्र, देवीचें स्थान, राजवाडा. **सावंतवाडी**:—रंगीत सामान, गंजिफा.

८ **मुंबई इलाख्यांतील संस्थानें**:—एकंदर ३६३ आहेत.

१ **मोठीं संस्थानें**:– बडोदें, पालनपूर, कच्छ, कोल्हापूर, जुनागड, भावनगर, नवानगर, खैरपूर, सावंतवाडी.

२ **एजन्सी**:– सुरत, पालनपूर, महिकांठा, रेवाकांठा, काठेवाड, सातारा, कोल्हापूर.

३ **जहागिरी**:–(पटवर्धन जहागिरी) सांगली, मिरज, कुरुंदवाड, बुधगांव, मिरज, जमखिंडी. **भावे**–रामदुर्ग. **नबाब**–सावनूर. **मराठे**:--जत, डफळापूर, मुधोळ.

## ९ भागवार संस्थानें:–

१ **सिंध**:–खैरपूर; नबाब. ( मुसलमान. )

२ **कच्छ**:–राजधानी भूज. मांडवी बंदर व दीपगृह. **प्राणी**:- घोडे, उंट. **लोक**:–व्यापारी व खलाशी. **धंदे**:–नकशी काम, व जरीचें काम.

३ **गुजराथ एजन्सीज**:– **सुरत एजन्सी**-वासदा, धरमपूर, सचीन. **पालनपूर एजन्सी**:-पालनपूर, डीसा. **महिकांठा एजन्सी** ईडर. दांटा. **रेवाकांठा एजन्सी**:–राजपिंपळा. **खंबायत संस्थान**:- खंबायत. **बडोदें संस्थान**:–बडोदें. हें संस्थान हिंदुस्थान सरकारच्या ताब्यांत आहे.

४ **काठेवाड एजन्सी**:–जुनागड, भावनगर, गोंडल, मोरवी, ध्रांगध्रा, राजकोट,

५ **मध्यभाग**:- **प. खानदेश**:–मेवासी प्रांत. **डांगदेश**:- यांत भिल्लांची वस्ती आहे. **नासिक**:-सुरगणा. **पुणें**:-भोर. **सातारा**- औंध, फलटण. **सोलापूर**:-अक्कलकोट.

६ **दक्षिणभाग**:-**ठाणें**:-जव्हार. **कुलाबा**:-जंजीरा. **रत्नागिरी**:-सावंतवाडी. **धारवाड**:-सावनूर.

७ द. म. तील संस्थानें:-कोल्हापूर, लहान संस्थानें (विशाळगड, कागल, बावडें, इचलकरंजी.)

**१० जातवार संस्थानें:--** ( राजाच्या जातीवरून ).

१ **ब्राह्मण**:--मिरज, सांगली, कुरुंदवाड, जमखिंडी (पटवर्धन). रामदूर्ग-भावे. औंध [पंतप्रतिनिधी]. इचलकरंजी ( घोरपडे ). भोर (पंतसचीव).

२ **रजपूत**:-कच्छ, काठेवाड व गुजराथ एजन्सी; भावनगर, राजपिंपळा, नवानगर वगैरे.

३ **मराठे**:-- बडोदें (गाय़कवाड). कोल्हापूर [ छत्रपति भोंसले ]. फलटण ( निंबाळकर ). अक्कलकोट [ भोंसलें ]. सावंतवाडी [ सर देसाई ]. मुधोळ ( घोरपडे ). जत [ डफळे ]. कागल [ घाटगे ].

४ **पठाण**:--पालनपूर. जंजीरा [ सिद्धी ]

५ **मुसलमान**:—खैरपूर, सचीन, खंबायत, सावनूर, जुनागड. पालनपूर.

६ **कोळी**:--सुरगणा (देशमूख), जव्हार. **भिल्ल**--डांगदेश.

**११ संस्थानिकांच्या पदव्या:**—**छत्रपति महाराज**:— कोल्हापूर. **महाराज**:--बडोदें, ईंदर, राजपिंपळा. **राव**:—कच्छ. **सरदेसाई**:—सावंतवाडी. **राजेसाहेब**:--मुधोळ. **पंतसचीव**:--भोर. **पंतप्रतिनिधी**:--औंध. **नबाब**--खैरपूर, जुनागड, सचीन, खंबायत, जंजीरा, सावनूर.

**१२ पोलिटिकल एजंटच्या रेसिडेन्सीज:**--भूज, राजकोट, बडोदें, पालनपूर, कोल्हापूर, सावंतवाडी.

**१३ कलेक्टरांच्या ताब्यांतील संस्थानें:**—सुरतएजन्सी--सुरत. सुरगणा--नासीक. जव्हार--ठाणे. अक्कलकोट--सोलापूर.

१४ **सर्वांत मोठें**:--व दाट वस्तीचें संस्थान बडोदें.

१५ **समुद्रः**--मुंबई इलाख्याच्या पश्चिमेस **अरबीसमुद्र** आहे.

१६ **बंदरें**:--मोठीं:–मुंबई, कराची, कारवार, वेंगुर्लें.

लहान बंदरें:--मांडवी [ कच्छ ]. द्वारका, पोरबंदर, वेरावळ, घोघो ( काठेवाड ). सुरत. ( सुरत ). उंबरगांव, माहीम, वसई (ठाणें). अलिबाग,रेवदंडा बाणकोट, दाभोळ, जयगड, रत्नागिरी, राजापूर, विजयदुर्ग, देवगड, मालवण, वेंगुर्लें, चिपळूण, [ रत्नागिरी ]. मार्मगोंवा ( गोंवें ). कारवार, अंकोला, कुमठें, होनावर, भटकळ, [ कारवार ].

१७ **दीपगृहें**:--अलिबाग, कुलाबा, मांडवी, राजापूर.

१८ **मिठागरें**:--उरण, कुर्लें, पेण, वसई.

१९ **आखातें**:--कच्छ, खंबायत.

२० **द्वीपकल्पें**:--कच्छ, काठेवाड.

२१ **भूशिरें**:--मांझ [ कराचीजवळ ] दीव ( काठेवाडच्या दक्षिणेस. )

२२ **सरोवरें व तलाव**:--मंचर [ सिंध. ] विहाड, तुलसी, तान्सा [ ठाणें ]. हीं सरोवरें मुंबई शहराच्या पाणी पुरवठ्याकरितां मुद्दाम बांधिलीं आहेत.

२३ **बेटें**:--मुंबई, साष्टी ( ठाणें ). द्वारका, दीव [ काठेवाड ]. उरण, घारापुरी ( ठाणें ).

२४ **वालुकामय प्रदेशः**--कच्छचें रण हें पाणथळ व क्षारमय आहे.

**२५ इतिहासप्रसिद्ध स्थळें**:-- सोमनाथ [ काठेवाड ]. उमरकोट ( सिंध ). बडोदें, सुरत ( गुजराथ ): रायगड, प्रतापगड ( कुलाबा ). सिंहगड, शिवनेरी, पुणें [ पुणें ]. श्रीगोंदें ( नगर ). सातारा, विजापूर.

[ग्रंथ संग्रहालय]

**२६ इतिहासप्रसिद्ध पुरुषांचीं जन्मस्थानें**:—उमरकोट ( अकबर ). होळ [ मल्हारराव होळकर ]. कणेरखेड [ राणोजी शिंदे ]. शिवनेरी ( शिवाजी ). वेळास [ नाना फडणीस ]. पोलादपूर [ बाजी देशपांडे ]. श्रीवर्धन [ बाळाजी विश्वनाथ ]. माहुली [ रामशास्त्री प्रभुणे ]. नगर [ चांदबिबी ].

**२७ इतिहासप्रसिद्ध पुरुषांचीं वसतिस्थानें**:—सुरत [ ईस्ट इंडिया कंपनीची वखार ]. बडोदें ( गायकवाड ). पुणें [ पेशवे ]. कोपरगांव ( राघोबादादा ). सातारा [ शिवाजीचे वंशज ]. अलिबाग ( जंजिऱ्याचे सिद्धी ). विजापूर [ अदिलशाही ]. रायगड ( शिवाजी ). नगर [ निजामशाही ]. हैदराबाद ( अमीर ).

**२८ किल्ले: डोंगरी किल्ले**:—शिवनेरी, सिंहगड, तोरणा. [ पुणें ]. अजिमतारा, परळी. ( सातारा ). रायगड, प्रतापगड. [ कुलाबा ]. **२ भुइकोट किल्ले**:—अहमदनगर, खर्डे. ( नगर ). मालेगांव. [ नासिक ]. विजापूर, बदामी, बेळगांव, पुणें. **३ जंजीरे**:—वसई. ( ठाणें ). अलिबाग. [ कुलाबा ]. मालवण, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग. ( रत्नागिरी ).

**२९ रणभूम्या**:—मियाणी [ सिंध अमीर व नेपियर १८४३ ]. कोरेगांव [ मराठे व इंग्रज १८१८ ]. खर्डे [ निजाम व मराठे १७९५ ]. तालीकोट [ विजयनगरचें हिंदुराज्य व बहामनी राज्यें १५६५ ]. वसई [ पोर्तुगीज व मराठे, १७३९ ]. अष्टें, खडकी ( इंग्रज व मराठे ).

**३० संत व कवि यांचीं स्थानें:**—कुमठें [ वामन पंडित सातारा ]. सोलापूर ( रामजोशी ). देहू ( तुकारामाची समाधि, पुणें ). परळी ऊर्फ सज्जनगड ( रामदासांची समाधि-सातारा ). आळंदी ( ज्ञानदेवाची समाधि-पुणें ). पुणतांबें [ चांगदेवाची समाधि-नगर ]. बारामती ( मोरोपंत-पुणें ). संगमनेर ( अनंतफंदी-नगर ). श्रीगोंदे ( शेख महंमद-नगर ). मंगळवेढे [ दामाजीपंत-सोलापूर ]. कऱ्हाड [ संत सखूबाई ].

**३१ क्षेत्रें:**—द्वारका, सोमनाथ. ( काठेवाड ). अबू ( रजपुताना ). डाकूर. ( गुजराथ ). नासिक, त्र्यंबक, सप्तशृंग. [ नासिक ]. भीमाशंकर, देहू, आळंदी, जेजुरी, निरानरसिंगपूर, चिंचवड. ( पुणें ). वांई, महाबळेश्वर, माहुली, कऱ्हाड, औदुंबर, धोम. [ सातारा ]. पंढरपूर, गाणगापूर, बार्शी [ सोलापूर ]. पुणतांबें. [ नगर ]. वज्राबाइ, निर्मळ. [ ठाणें ]. प्रतापगड, (कुलाबा). परशुराम. [ रत्नागिरी ]. संकेश्वर, सौंदत्ती. ( बेळगांव ). गोकर्ण, महाबळेश्वर. [ कारवार ]. कोल्हापूर नरसोबाचीवाडी.

**३२ म्युनिसिपल मोठीं शहरें:**—मुंबई, अहमदाबाद, पुणें, कराची, सुरत, बडोदें, सोलापूर, कोल्हापूर, हुबळी, गदग.

**३३ प्रेक्षणीय स्थलें:**—मनोरे-कऱ्हाड, जैनांचीं देवालयें-अबू गिरनार, सोलापूर. प्रसिद्ध इमारती-विजापूर, पुणें, कोल्हापूर, अहमदनगर, बडोदें.

**३४ कॉलेजें:**—राजकोट [ राजकुमार कॉलेज ]. अहमदाबाद, बडोदें, पुणें, मुंबई, सांगली, कोल्हापूर, धारवाड.

**३५ शिल्पशाळा:**—बडोदें, पुणें, रत्नागिरी.

**३६ जंक्शन स्टेशनें:**—हैदराबाद, राजकोट, वढवाण,

अहमदाबाद, बडोदें, जळगांव, भुसावळ, मनमाड, कल्याण, पुणें, हुटगी, मिरज, लोंढा, हुबळी.

**३७ लष्करी छावण्याः**–जाकोबाबाद, डीसा, भगूर, नगर, पुणें, ( खडकी, घोरपडी, वानवडी ). बेळगांव.

**३८ रेल्वे कारखानेः**—भुसावळ, हुबळी. मिरज, पेरळ.

**३९ पर्वतः**–हाला ऊर्फ खिरथर ( सिंध.) गिरनार (काठेवाड). विंध्य (गुजराथ). सातपुडा [नर्मदा व तापी यांमध्यें] सह्याद्रि [देश व कोंकण यांमध्यें]

**४० पूर्व पश्चिम पर्वतः**–विंध्य, गिरनार, सातपुडा.

**दक्षिणोत्तर पर्वतः**–हाला, सह्याद्रि.

**४१ डोंगरः**–राजपिंपळा (नर्मदा व तापी यामध्यें). चांदवड, कळसूबाई (नासिक). शंभू महादेव (सातारा]. जोतिबा (कोल्हापूर.) हरिश्चंद्र गड [नगर]. वैजनाथ (बेळगांव.) अजिंठा किंवा सातमाळा [पू. खानदेश ).

**४२ शिखरेंः**–कळसुबाई (सह्याद्रि.) अबू ( अरवली ). कैमूर ( विंध्य ). महादेव व पंचमडी ( सातपुडा ). मलयगिरी ( सह्याद्रि ).

**४३ खिंडीः**–बोलन ( सक्कर रस्ता ). खैबर ( अटक रस्ता ).

**४४ घाटः**–थळघाट ( नासिक. ) बोरघाट ( खंडाळें. ) कुंभार्ली ( चिपळूण ). आंबेघाट ( कोल्हापूर रस्ता ). फोंडा घाट ( देवगड-रस्ता ) आंबोली घाट ( बेळगांव रस्ता ). तिनैघाट ( धारवाडरस्ता ).

**४५ कोरींव लेणींः**–अजिंठा ( पूं. खानदेश ). कार्लें (पुणें). कानेरी, ( ठाणें ), घारापुरी ( कुलाबा ).

**४६ उत्तम हवेचीं ठिकाणें**:—महाबळेश्वर, पांचगणी (सातारा). माथेरान, रायगड (ठाणे). लोणावळें, खंडाळें, पुरंदर; सिंहगड (पुणें). अबू (गुजराथ). सप्तशृंग; इगतपुरी; त्र्यंबक (नासिक). हरिश्चंद्र गड (नगर). दापोली (रत्नागिरी). मिरज.

**४७ उन्हाळीं**:—चोपडें (पू. खा.), वज्रेश्वरी (ठाणें.), राजापूर [रत्नागिरी.]

**४८ पोर्तुगीज**—लोकांच्या ताब्यांतील प्रदेशः— गोवें, दमण, दीव.

**४९ नद्या**:—सिंधु, साबरमती, मही, लुनी, नर्मदा, तापी, गोदावरी, कृष्णा.

**५० सिंधु**:—ही हिमालयांत मानससरोवराजवळ उगम पावून पश्चिम व दक्षिण या दिशांनीं पंजाब, सिंध प्रांत यांतून वहात जाऊन अरबी समुद्रास मिळते. उ. मि. नद्याः—**काबूल**:-अटके जवळ. **पंचनदी** [जेहलम, चिनाब, रावी, बियास, सतलज.] मिथनकोटा जवळ. कांठीं गांवें:- **सक्कर, हैदराबाद**. सिंधूचें पात्र वारंवार बदलतें. सिंधूचे कालवे फार काढिले आहेत.

**५१ लुनी**:—ही राजपुतान्यांत अरवलीच्या फांट्यांत उगम पावून कच्छच्या रणास मिळते.

**५२ साबरमती**:—ही राजपुतान्यांत अरवलीच्या फांट्यांत उगम पावून खंबायतच्या आखातास मिळते. कांठीं गांव **अहमदाबाद**.

**५३ मही**:—ही माळव्यांत उगम पावून खंबायतच्या आखातास मिळते. कांठीं गांव. **खंबायत**.

५४ **नर्मदाः**—ही रेवासंस्थानांत अमरकंटका जवळ उगम पावून विंध्य व सातपुडा यांच्या मधून वहात जाऊन खंबायतच्या आखातास मिळते. हिचा जबलपूर जवळील संगमरवरी खडकांतील देखावा रमणीय आहे. हिचा प्रवाह जोराचा. जलमार्ग निरुपयोगी आहे. कांठीं गांव **भडोच**.

५५ **तापीः**—ही सातपुड्यांत बैतुलाजवळ उगम पावून पश्चिमेस खंबायतच्या आखातास मिळते. कांठीं गांव **सुरत**. डा. मि. पूर्णा, गिरणा ( मोसम ), बोरी, पांझरा. **धुळें** ( पांझरा ). **अंमळनेर** ( बोरी ).

५६ **गोदावरीः**— ही सह्याद्रींत नासिक जिल्ह्यांतील त्र्यंबकेश्वर येथें उगम पावून पूर्वेकडे राजमहेंद्रीजवळ बंगालच्या उपसागरास मिळते. **कांठीं गांवें**: त्र्यंबक, नासिक, कोपरगांव, पुणतांबें, नेवासें, पैठण, राजमहेंद्री. **डा. मिः**—कादवा, पूर्णा, प्राणहिता [ पैनगंगा, वर्धा, वैनगंगा. ] इंद्रावती. **उ. मिः**—दारणा, प्रवरा, मांझरा. **संगमनेर** [ प्रवरा. ] गोदावरीस कालवे पुष्कळ काढिले आहेत.

५७ **कृष्णाः**—ही सह्याद्रींत महाबळेश्वराजवळ उगम पावून पूर्वेस मच्छलीपट्टणाजवळ बंगालच्या उपसागरास मिळते. **कांठीं गांवें**:—महाबळेश्वर, धोम, वांई, माहुली, कऱ्हाड, औदुंबर, सांगली, नरसोबावाडी, मच्छलीपट्टण. **डा मिः**—भीमा, डोण, वेरळा. **उ. मिः**—तुंगभद्रा, वेण्णा, कोयना, वारणा; पंचगंगा, घटप्रभा, मलप्रभा, वर्धा. **कां. गांवें**:—कऱ्हाड (कोयना). गोकाक, मुधोळ, बागलकोट ( घटप्रभा ). तालीकोट ( डोण. ). कृष्णेस कालवे काढिले आहेत.

**५८ भीमा**:—ही पुणें जिल्ह्यांत भीमाशंकर येथें उगम पावून कृष्णेस मिळते. डा. मिः-घोड, सिना. उ. मि:-इंद्रायणी मुळा मुठा, निरा, माण. **कांठीं गांवें**:-देहू, आळंदी, [इंद्रायणी]. भीमाशंकर, कोरेगांव, दौंड, निरानरसिंगपूर, पंढरपूर (भीमा).

**५९ शरावती**:-ही कारवार जिल्ह्यांतून पश्चिमेकडे अरबी-समुद्रास मिळते. हिचा गिरसाप्पाजवळ मोठा धबधबा आहे.

**६० कोंकणांतील नद्या**:--अरबीसमुद्रास मिळणाऱ्या. **ठाणें जिल्हा**:-तान्सा, वैतर्णा, उल्हास. **कुलाबा**:-अंबा, कुंडलिका, सावित्री. **रत्नागिरी**:-वासिष्टी, सावित्री, शास्त्री, मुचकुंदी.

**६१ उत्तरवाहिनी**:—खारी (कच्छ). **द. वा.** सिंधु, लुनी, साबरमती, मही. **पू. वा**:–गोदावरी, कृष्णा, भीमा, निरा, घटप्रभा, **प. वा**:--नर्मदा, तापी, शरावती, वैतर्णा, सावित्री, शास्त्री.

**६२ अरबी समुद्रास** मिळणाऱ्या नद्या:—लुनी, खारी. (कच्छ आखात). साबरमती, मही, नर्मदा, तापी (खंबायत आखात). सिंधु, शरावती, सावित्री, वासिष्टी. **बंगाल उप. मि.** कृष्णा, गोदावरी.

**६३ उगम-हिमालयांत**:—सिंधु. **अरवली**–लुनी साबरमती. **विंध्य**–मही. **सातपुडा**–नर्मदा, तापी. **सह्याद्री-पूर्व वाहिनी**–गोदावरी, भीमा, कृष्णा. **प. वा.**—वैतर्णा, सावित्री, वासिष्टी, कुंडलिका, शरावती. मुचकुंदी, अंबा, शास्त्री.

**६४ प्रांतवार नद्या**:—**सिंध**–सिंधू. **गुजराथ**--साबरमती; मही, नर्मदा, तापी. **महाराष्ट्र**–गोदावरी, भीमा, निरा. कृष्णा. **द. महाराष्ट्र**–घटप्रभा, मलप्रभा, तुंगभद्रा, शरावती.

श्री ... संग्रहालय

६५ **मुंबई इलाख्यांत उगम पावून इतर प्रांतांत वाहणाऱ्या नद्याः**—गोदावरी, भीमा, तुंगभद्रा, कृष्णा. **इतर प्रांतांत उगम पावून मुंबई इलाख्यांत वाहणाऱ्याः**—सिंधु, लुनी, साबरमती, मही, नर्मदा, तापी, शरावती. **मुंबई इलाख्यांत उगम पावून त्यांतच वाहणाऱ्याः**—मलप्रभा, घटप्रभा, निरा, मुळामुठा, गिरणा, प्रवरा, सावित्री, वासिष्टी, कोयना, वारणा, पंचगंगा.

६६ **जिल्हावार नद्याः—प. खाः**—तापी, पांझरा, बोरी, **पू. खाः**—पूर्णा, गिरणा, बोरी, तापी. **नासिकः**—गोदावरी, गिरणा, दारणा, मोसम, कादवा. **पुणें:**—भीमा, निरा, मुळा, मुठा. **नगर**—गोदावरी, भीमा, प्रवरा, सीना. **साताराः**—कृष्णा, निरा, वारणा, कोयना, वेरळा, वेणा, माण, **सोलापूरः**—भीमा, निरा, माण, सीना. **बेळगांवः**—कृष्णा, घटप्रभा, मलप्रभा, ताम्रपर्णी, मार्कंडी, हिरण्यकेशी, वेदगंगा, दूधगंगा. **धारवाडः**—मलप्रभा, तुंगभद्रा. **कारवारः**-वर्धा, शरावती. **विजापूरः**—कृष्णा, भीमा.

६७ **नद्यांचीं उगम स्थानें**—मानससरोवर [ सिंधु ]. अमरकंटक ( नर्मदा ). बैतूल (तापी). त्र्यंबकेश्वर (गोदावरी). महाबळेश्वर ( कृष्णा ). भीमाशंकर ( भीमा ).

**नद्यांचीं संगमस्थानें:**—मिथनकोट ( पंचनदी-सिंधु ). निरा-नरसिंगपूर [ भीमा-निरा ]. कऱ्हाड [ कृष्णा-कोयना ]. नरसिंहवाडी [ कृष्णा-पंचगंगा ].

६८ **नद्यांचीं मुखें**—खंबायत ( मही ). अहमदाबाद [ साबरमती ]. भडोच [ नर्मदा ]. सुरत [ तापी ]. राजमहेंद्री [ गोदावरी ]. मच्छलीपट्टण [ कृष्णा ].

६९ **जलमार्ग:**—सिंधु, नर्मदा, तापी, यांचा उपयोगी नाहीं. कारण मुखांत गाळ सांचलेला आहे. व प्रवाह जोराचा आहे.

**७० धबधबे**:-गिरसाप्पा-[ शरावतीचा, कारवार ]. गोकाक ( घटप्रभेचा बेळगांव जिल्ह्यांत ).

**७१ धरणें**:-सक्कर, लोणावळें, खडकवासलें (पुणें). गोकाक, भाटघर, भंडारदरा.

**७२ कालवे**:-सिंधु, निरा, मुळा मुठा, कृष्णा, गोदावरी, या नद्यांचे कालवे काढिले आहेत.

**७३ खाड्या**:-वसई, नागोठाणें, रेवदंडा, बाणकोट, दाभोळ, विजयदुर्ग, देवगड.

---

# सामान्य माहिती.

**७४ प्रदेशाचें स्वरूप**:-**सिंधप्रांत**-सखल व ओसाड आहे. **काठेवाड**-किनाऱ्याचा प्रदेश सखल, मधला उंचवट्याचा आहे. **गुजराथ**-उंचवट्याचा, सुपीक. **कोंकण**-सखल, व दाट झाडी, दलदलीचा असा आहे. **सह्याद्रीच्या पूर्वेकडील देश**-उंचवट्याचा व सुपीक आहे.

**७५ हवामान**:-( एकाद्या प्रदेशाचें सरासरी उष्णतामान ).

**हवामानाचे प्रकार**:— १ उष्ण किंवा थंड, २ सम किंवा विषम. ३ दमट किंवा कोरडी. ४ रोगी किंवा निरोगी.

१ **समहवा**:-(उष्णता व थंडी बेताची असते; अशी हवा). उदा० समुद्र किनारा; कोंकण.

२ **विषम हवा**:-[जास्त उष्णता व जास्त थंडी; असें हवामान ]. उदा० मोठा भूप्रदेश. सिंध, महाराष्ट्र. उत्तर गुजराथ.

**३ उष्ण हवाः**—(जास्त उष्णतामान). सिंध, गुजराथ, देश.

**४ थंड हवाः**–( कमी उष्णतामान ). सह्याद्रीचा माथा.

**५ दमट हवाः**–(वाफेचें प्रमाण जास्त अशी हवा). कोंकण.

**६ कोरडी हवाः**–(वाफेचें प्रमाण कमी अशी हवा ). सिंध, महाराष्ट्र.

**७ रोगी हवाः**–ठाणें जिल्हा, कारवार जिल्हा, दलदलीचा प्रदेश. ह्यांतील हवा रोगट आहे.

**८ निरोगी हवाः**–[ थंड व कोरडी अशी हवा ]. सातारा, पुणें, बेळगांव.

**७६ निरनिराळ्या भागांतील हवामानः**–**सिंध**-कडक उन्हाळा. **कोंकण**-थंड व सम हवा. **देश**-कोरडी व उष्ण हवा.

**७७ हवामानाचे परिणामः**–**थंड** हवेंतील लोक वर्णानें गोरे, कंटक व उद्योगी असतात. **उष्ण** हवेंतील लोक काळे, कमी बुद्धिमान् व कमी उद्योगी असतात.

**७८ पाऊसः**–**१ मान्सून वारे**:-निरनिराळ्या ऋतूंत नियमितपणें वाहणारे वारे. २ **नैर्ऋत्येकडून वाहणारे वारे**-हे एप्रील ते सपटंबर पर्यंत वाहतात. अरबी समुद्राकडून वाहतात. यांनीं कोंकण, सह्याद्रि, गुजराथ यांत पाऊस पडतो. या पावसावर खरीपाचीं पिकें होतात. ३ **ईशान्येकडून वाहणारे वारेः**–हे आक्टोबर ते मार्च पर्यंत वाहतात. पाऊस थोडा पडतो. या हंगामांत रब्बीचीं पिकें होतात. **पाऊसः**–सह्याद्री, कोंकण, गुजराथ यांत फार पडतो. देशावर बेताचा पडतो. व सिंधमध्यें थोडा पडतो. नगर, सिंध, सोलापूर यांत क्वचित् दुष्काळ पडतो.

**७९ सुपीकपणाः**–[ जमिनीचा कस ].

१ **नदीकांठच्या प्रदेशांत** गाळ सांचून " गाळाच्या सुपीक जमिनी " तयार होतात. २ **खडकाळ व डोंगराळ** प्रदेश नापीक असतो. ३ **सिंधमध्येंः**-सिंधूच्या कांठची जमीन सुपीक. इतर सुपीक जमिन आहे, पण पाऊस पडत नाहीं. सक्करच्या धरणामुळें सिंध अतिशय सुपीक होईल. ४ **गुजराथः**-जमीन कसदार, फार सुपीक. ५ **महाराष्ट्रः**-नद्यांच्या कांठचे प्रदेश सुपीक. जमीन कसदार. ६ **कोंकण**--जमीन रेताड ह्मणून नापीक. ७ **सुपीकपणाचे नंबरः**-गुजराथ, खानदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, सिंध.

८० **जमिनीचें उत्पन्न व पिकेंः--देशः**-गहूं, ज्वारी, बाजरी, हरबरा, तूर, कापूस, गाळिताचीं धान्यें, मका, तीळ, करडी, जवस, ऊंस, अंबाडी, नीळ, मिरची, लाख, खजूर, तंबाकू, भुइमूग, हळद. **कोंकणः**-तांदूळ, नाचणी, वरी, नारळ, सुपारी, बटाटे, वाल. **दक्षिण कोंकण, कारवारः**--वेलदोडे, सुपारी, मिरीं, चंदन, कॉफी, ताग, बटाटे, हरडे, अमसोलें, काजू, नारळ. **कापूस पिकणारा प्रदेशः**--सिंध, गुजराथ, खानदेश, सोलापूर.

८१ **फळेंः--देश**-पेरू, डाळिंब, लिंबें, अंजीर, पपनस, नारिंग, संत्रीं, कलिंगड, द्राक्षें. **कोंकण**-केळीं, आंबे, फणस, काजू, अमसोलें.

८२ **झाडेंः—देशः** बाभूळ, लिंब, कळक, चिंच, खैर, पिंपळ, वड. **कोंकणः**-सागवान, फणस, आंबा.

८३ **प्राणीः--हिंस्र**-वाघ, कोल्हा, खोंकड, तरस, लांडगा, रानडुक्कर. **इतर प्राणीः**--घोडे [काठवाड]. उंट [सिंध]. हत्ती [काठेवाड]. रानगाढवें (कच्छ). तट्टें (नगर). ससे, हरणें, सुसरी, माकड, सर्प. **पाळींवः**-गाय, बैल, हैस, मेंढ्या, शेळ्या.

**८४ पक्षी:**--कावळा, घार, चिमणी, बहिरी ससाणा, मोर, राघू, कबूतर, मैना, पारवा, गिधाड, कोंबडा, कोकीळ, बगळा, टोळ, करकोचा.

**८५ खनिज संपत्ति:**—**सोनें** (धारवाड). **लोखंड, मँगनीज** [ पंचमहाल ] **दगडी कोळसा** ( सिंध, कच्छ ). **पोरबंदरी व शहाबादी दगड** ( पोरबंदर ). **हिरे** ( कृष्णा गोदावरी कांठ ). **रुपें** [ कच्छ ]. **तांबें** [ अरवली ]. **शिसें** [ गुजराथ ]. **तुरटी** [ कच्छ, काठेवाड ]. **मोतीं** ( कच्छ ). **मीठ** ( खाराघोडा ).

**८६ दळणवळणाचीं साधनें:**-पक्क्या सडका, आगगाड्या, आगबोटी, पोष्ट व तारखातें, टेलिफोन, कालवे, विमानें.

**८७ पक्क्या सडका:**—१ मुंबई ते नासिक धुळें वरून दिल्ली. २ मुंबई ते मद्रास. ३ मुंबई ते हरिहर. ४ वेंगुर्ला ते बेळगांव. ५ कारवार ते गदग.

**८८ रेल्वे:**—**१ ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे:**— ( जी. आय्. पी. ) शाखा-मुंबई ते भुसावळ. कल्याण ते हुटगी. दौंड ते मनमाड, धुळें ते चाळिसगांव; अंमळनेर ते जळगांव; नेरळ ते माथेरान; पंढरपूर ते बार्शी:— **२ दी बाँबे बडोदा आणि सेंट्रल इंडिया रेल्वे** [ बी. बी. ऍंड सी. आय्. रेल्वे ]:—शाखा मुंबई ते बडोदा, सुरत ते अंमळनेर, अहमदाबाद ते डीसा. **३ मद्रास आणि सदर्न मराठा रेल्वे** [ एम्. एस्. एम् अ.र्. ] **शाखा**-पुणें ते गदग, लोंढा ते मार्मगोवा. मिरज ते सांगली, मिरज ते कोल्हापूर, हुबळी ते हुटगी हुबळी ते हरिहर. **४ रजपुताना माळवा रेल्वे** अहमदाबाद ते मारवाड. **५ जोधपूर बिकानेर रेल्वे**:—मारवाड ते हैदराबाद. **६ सिंध पंजाब रेल्वे**--( नॉर्थ वेस्टर्न रेल्वे ). कराची ते जाकोबाबाद. **७ काठेवाड रेल्वे:**—वढवाण ते भावनगर, वेरावळ ते मोरवी. राजकोट ते वढवाण. **८ तापी व्हॅली रेल्वे**:-सुरत ते अंमळनेर. **९ गोदावरी व्हॅली रेल्वे**-मनमाड ते हैदराबाद.

## ८९ कारखाने व उद्योगधंदे:-

**व्यापारी पेठा**:-चिपळूण, निपाणी, पुणें, मालवण, वेंगुर्लें, शाहापूर, फैजपूर. **हातमाग**:-खानदेश, सोलापूर, धारवाड, **खादी पासोड्या**:-फैजपूर, चिकोडी. **लुगडी खण**. अहमदाबाद, सोलापूर, धारवाड, फैजपूर, पुणें, जुन्नर, इलकल, सांगली, संगमनेर, भिवंडी, **गालिचे, सतरंज्या**:-हैदराबाद, उमरकोट, तालीकोट. **गिरण्या सरकी काढणें, सूत काढणें, कापड विणणें**:-अहमदाबाद, अहमदनगर, गोकाक, जळगांव, ठाणें, धुळें, अंमळनेर, मुंबई, सोलापूर, भडोच, बार्शी, भिवंडी. **लोंकरीचें कापड**:- व **रेशमी कापड**-अहमदाबाद, येवलें, पुणें, ठाणे, भिवंडी, भूज, पैठण, बारामती. **जर व किनखापी कापड**:-अहमदाबाद, सुरत, भूज, येवलें, पुणें, हैदराबाद. **आगपेट्या**:-अहमदाबाद, कऱ्हाड, बेळगांव. **औषधें**:-पनवेल. **कसाईखाना**:-वांद्रें. **कागदाच्या गिरण्या**:-भावनगर, अहमदाबाद, मुंढवें, हडपसर, मुंबई, जुन्नर, पुणें, **कांचकारखाने**:-ओगलेवाडी, तळेगांव, बडोदें. **कांचेच्या बांगड्या व मणी**:-घोडगेरी, अहमदाबाद. **कातडीं कमावणें**:-शहापूर. **कौलें**:-मंगळूर. **छत्र्या**:-पुणें, **तूप**:-खानदेश, 'धारवाड. **तेल गाळणें**:-पुणें, बेळगांव. **तंबाकू व बिड्या**:-पुणें. **धातूंचीं भांडीं**:-पुणें, हुबळी, नासिक, सांगली, संगमनेर, शाहापूर **धातूवरील नकशी काम**:-भूज, पुणें. **सोन्यारुप्याचे दागिने व जडावाचें काम**:-कोल्हापूर, सांगली, पुणें, मुंबई, नासिक. **शिंगावरील नकशी काम**:-विजयदुर्ग. **धान्याचा व्यापार**:-पुणें, कर्जत, महाड, पेण. **मीठ**:-खाराघोडा. **लांकूड**:-तळोदें, पुणें, तावरकट्टी. **फर्निचर व रंगीत सामान**:-रत्नागिरी, सावंतवाडी, गोकाक. **कोरीव काम**-लांकूड व हस्तिदंत-पुणें, अहमदाबाद. **लोखंडी नांगर**:-किर्लोस्कर वाडी, पुणें, सातारा. **साखर**:-पुणें.

ता. क्र. .....

**साबण**:-मुंबई, **सुकेळीं**:-आगाशी, वसई. **संगमरवरी दगड**:-दांटा, राजपिंपळा, नांदोद.

९० **आयात मालः**—हा बहुतेक पक्का असतो. ( १०० कोटि ). धातूंचे पत्रे, कापड व सूत, सोनें, रुपें, साबूदाणा, चहा, चिनी मातीचीं भांडीं, मसाले, सिगारेट, रंग, हस्तिदंत, हिंग, लोखंड, साखर, राकेल, छत्र्या, रेशीम, लोंकर, यंत्रें, कांच, दारू, चाकू, कात्र्या, कागद, घड्याळें, औषधें, दगडी कोळसा, स्टेशनरी, केशर, कापूर, फटाकड्या, आगपेट्या, खेळणीं. **देशावरून कोंकणांत जाणारा माल**:--गूळ, कापूस, कापड, मिरची, धान्यें, तंबाकू; **कोंकणांतून देशावर येणारा माल**:--नारळ, सुपारी, वेलदोडे, तांदूळ, काथ्या, खोबरेल, मासे, मीठ.

९१ **निर्यात मालः**—हा बहुतेक कच्चा माल असतो. [ १५० कोटि ]. कापूस, गहूं, अफू, सूत, धान्यें, हरडा, कातडीं, लोंकर, हाडें, गळिताचीं धान्यें, नीळ, राळ, लाख, कॉफी, मसाले, फळें, लांकूड, सुपारी, तंबाकू, मोतीं, जनावरें-गाई, म्हशी, घोडे, बकरीं वगैरे.

मुंबई, कराची या बंदरांतून माल जातो व येतो. **कराचीहून निर्यात माल**:--गहूं ( पंजाबांतील ). कापूस [ सिंध ]. लोंकर ( पंजाब ). जनावरें. **मुंबईहून निर्यात माल**:--अफू ( माळवा ). कापूस [ गुजराथ, खानदेश, वऱ्हाड ]. धान्यें ( देश ). नारळ, सुपारी [ कोंकण ].

९२ **लोकः**--हिंदु, मुसलमान, [ सिंध ]. ख्रिस्ती ( ठाणें, नगर, गोवें ). पार्शी ( सुरत, मुंबई ). जैन ( गुजराथ, महाराष्ट्र ). यहुदी, भिल्ल. कोळी. **लोकस्थितिः**—पार्शी विद्येंत व व्यापारांत पुढें आहेत. भिल्ल, कोळी, अस्पृश्य मागासलेले आहेत. ब्राह्मण विद्येंत

पुढें आहेत. मुसलमान लोक कडवे व शूर असून व्यापार करितात. **लोक वस्ती:**—पुणें, सोलापूर, गुजराथ यांत दाट आहे. सिंध, कोंकण यांत वस्ती पातळ आहे.

**९३ भाषा:**—सिंधी [ सिंध ]. कच्छी (कच्छ). गुजराथी (गुजराथ). मराठी [देश व कोंकण]. कानडी (कर्नाटक). उर्दू (मुसलमान लोक). इंग्रजी [ पारशी, ख्रिस्ती व सुशिक्षित ].

**९४ शिक्षण:**—प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करण्याबद्दल कायदा पास झाला आहे. त्याची बजावणी सुरू होईल. दुय्यम शिक्षण, उच्च शिक्षण, धंदेशिक्षण, शेतकी शिक्षण ह्यांच्या शाळा अनेक आहेत.

**९५ लोकांचे धंदे:**—शेती करणें, गुरें बाळगिणें, कापड विणणें, मासे धरणें, मीठ करणें, व्यापार, नौकरी.

**९६ राज्य--व्यवस्था:**—आपला हिंदुस्थान देश इंग्लंडच्या ताब्यांत असून **सार्वभौम पांचवे जार्ज** हे हिंदुस्थानचे बादशहा आहेत. आपल्या मुंबई इलाख्यावर '**गव्हर्नर इन्कौन्सिल**' नांवाचे अधिकारी बादशाहा नेमितात, त्यांच्या मदतीस **कार्यकारी कौन्सिल** व **कायदे कौन्सिल** अशा दोन सभा आहेत. राज्यव्यवस्थेकरितां खातीं पाडलीं असून त्यांचे राखीव खातीं व सोपीव खातीं असे प्रकार आहेत. **राखीव खातीं**:--रेव्हेन्यू, जमाबंदी, अंतव्यवस्था, न्याय, पोलिस, स्टांप, जल, पाटबंधारे, दुष्काळनिवारण, तुरुंग, स्टांप, नोंदणी. हीं असून त्यांवर ४ अधिकारी आहेत. **सोपींव खातीं**:—आरोग्य, वैद्यक, शिक्षण, रजिस्टर्ड संस्था, शेतकी, नोंदणी, अबकारी, लो. बोर्डें, म्युनिसिपालिट्या, जंगल, पब्लिक वर्क्स, पतपेढ्या, या खात्यांवर तीन दिवाण आहेत. **उत्पन्नाचीं**

खातीं:--जमीन महसूल, जकात, प्राप्तीवरील कर, जंगल, मीठ, मादक पदार्थ, पोष्ट, स्टांप. **खर्चाचीं खातीं**:--पोलिस, शिक्षण, पब्लिक वर्क्स, दुष्काळनिवारण, तुरुंग, पाटबंधारे.

९७ प्रत्येक खात्यावर अंमलदार नेमिले आहेत. ते कायदे-कौन्सिलच्या हुकमतीप्रमाणें वागतात. चीफ सेक्रेटरी, हायकोर्ट जज्ज, डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन, इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस, सर्जन जनरल वगैरे. अधिकारी आहेत.

**९८ कमीशनरी भाग**:—मध्यभाग, दक्षिणभाग, वगैरे भागांवर कमीशनर आहेत. त्यांजकडे स्थानिक स्वराज्य व मुलकीं हीं कामें आहेत. विद्याखात्यावर ' एज्युकेशनल इन्स्पेक्टर ' आहेत.

**९९ जिल्हा**:—जमीन महसूल व फौजदारी खटल्यांची चौकशी यासाठीं **कलेक्टर** किंवा **डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट**, असिस्टंट कलेक्टर, डेप्युटी कलेक्टर आहेत. **सेशनजज्ज**, असि. जज्ज, दिवाणी व फौज-दारी खटले तपासतात. दवाखान्यांवर **सिव्हिल सर्जन**. रस्ते, कालवे ह्यांवर **एक्झीक्युटिव्ह एंजिनियर**. गुन्हेगार पकडून शांतता राख-णाऱ्या पोलिस खात्यावर **पोलिस सुपरिंटेंडेंट** आहेत. या शिवाय फॉरेस्ट ऑफिसर, डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर आहेत.

**१०० तालुका**:—**मामलेदार**—( जमीन महसूल, खजीना, गुन्हे तपासणें, ) यांच्या कचेरींत हेड कारकून किंवा शिरस्तेदार असतो. **फौजदार** [ गुन्हेगार पकडणें ]. सबरजिस्ट्रार ( दस्त ऐवज नोंदणें ). पोष्टमास्तर [ पोष्टखातें ]. तालुका मास्तर; फारेस्ट रेंजर, राउंडगार्ड [ जंगलें व कुरणें ]. व्हॅक्सिनेटर [ देवी काढणें ]. सबजज्ज ( न्यायखातें ). असे अंमलदार आहेत.

**१०१ गांव**:—**पोलिसपाटील**:—( गांवचा वसूल गोळा करून मामलेदाराकडे पाठविणें, गांवची स्वच्छता ठेवणें, गुन्ह्याची

चौकशी करणें, जनन मरणाची नोंद ठेवणें ). हिशेब लिहिण्याकरितां कुलकर्णी आहेत.

**१०२ स्थानिक स्वराज्यः**—१ **म्युनिसिपालिट्याः**—शहरचीं स्वच्छता ठेवणें, आरोग्य, शिक्षण, पाणी पुरवठा, रस्ते वगैरे कामाकरितां घरपट्टी, जकात, वगैरेच्या रूपानें कर घेतात. त्याची व्यवस्था लोकांनीं निवडून दिलेली मंडळी असते, ती पाहाते. **२ म्यु. शहरेंः**—मुंबई, कराची, अहमदाबाद, पुणें, धुळें, सोलापूर, सातारा, बेळगांव वगैरे.

**१०३ लोकलबोर्डः**—लोकल फंडाच्या उत्पन्नांतून जिल्ह्यांत रस्ते करणें, विहिरी खोदणें, शिक्षण देणें, आरोग्य राखणें हीं कामें करण्याकरितां लोकांनीं निवडून दिलेली मंडळी असते, तालुक्यास तालुकालोकलबोर्ड व जिल्ह्यास जिल्हालोकलबोर्ड अशा संस्था असतात.

**१०४ संस्थानच्या राज्यव्यवस्थेवर देखरेखः**—मोठ्या संस्थानावर देखरेख ठेवण्याकरितां ' **रेसिडेंट** ' आहेत. बडोदें संस्थान हिंदुस्थान सरकारच्या ताब्यांत आहे. लहान संस्थानांवर **पोलिटिकल** एजंट आहेत. अगदीं लहान संस्थानांचा समूह करून त्यास **एजन्सी** नांव देतात. एजन्सीवर पोलिटिकल एजंट आहेत. पोलिटिकल एजंट व रेसिडेंट हे गव्हर्नरच्या ताब्यांत असतात.

# पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या.

१ **आखात**:—समुद्राचा फांटा अरुंद असून तो जमिनींत दूरवर गेला असतो, त्यास **आखात** ह्मणतात.

२ **आयात माल**:—स्वदेशांत येणारा माल.

३ **इलाखा**:—अनेक भाग मिळून झालेला जो प्रदेश त्यास **इलाखा** ह्मणतात.

४ **उगम**:—नदी अगर ओढा जेथून उत्पन्न होतो, तें ठिकाण.

५ **उंचवट्याचा प्रदेश**:—समुद्रसपाटीपेक्षां जास्त उंच असा प्रदेश.

६ **उन्हाळें**:—पृथ्वीच्या पोटांतील उष्णतेमुळें कांहीं झऱ्यांचें पाणी ऊन असतें, अशा झऱ्यास **उन्हाळें** ह्मणतात.

७ **उपसागर**:—आखाताचें तोंड रुंद व पसरट असल्यास त्यास **उपसागर** ह्मणतात.

८ **एजन्सी**:—पोलिटिकल एजंटाच्या देखरेखीखालीं असणाऱ्या अनेक संस्थानांच्या समूहास **एजन्सी** ह्मणतात.

९ **ओढा**:—लहान नदीस किंवा मोठ्या ओहोळास **ओढा** ह्मणतात.

१० **ओहोळ**:—जास्त पाऊस पडला ह्मणजे पाणी उतारावरून वहात जातें, त्यास ओहोळ ह्मणतात.

११ **ओहोटी**:—समुद्राचें पाणी ओसरतें, त्यास ह्मणतात.

१२ **कडा**:—पर्वत किंवा डोंगर ह्याची एक बाजू तुटून भिंती-सारखी झालेली असते, त्यास ' कडा ' ह्मणतात.

१३ **कच्चामाल**:—सृष्टीमध्यें आपोआप उत्पन्न होणारा माल. उदा० लांकूड, माती, धान्य, कापूस.

१४ **कालवा**:—नदी किंवा सरोवर ह्याचा पाट काढून जमिनींत दूरवर नेलेला असतो, त्यास कालवा ह्मणतात.

१५ **किनारा**:—समुद्राची कड.

१६ **किल्ला**:—शत्रूपासून संरक्षण होण्याकरितां सभोंवती तट बांधून तयार केलेल्या प्रदेशास किल्ला ह्मणतात, किल्ल्याचे तीन प्रकार आहेत. १ डोंगरी (गड), २ भुइकोट, ३ जंजिरा किंवा दुर्ग.

१ डोंगरी किल्ला:—डोंगरमाथ्यावर कडा पाडून केलेला किल्ला.

२ भुइकोट:—सपाट प्रदेशांत गांवठाणाभोंवतीं तट बांधून. व सभोंवतीं खंदक खणून केलेला किल्ला.

३ जंजीरा:—समुद्र किनाऱ्यावर तट बांधून केलेला किल्ला.

१७ **कोंकण**:—सह्याद्रीच्या पश्चिमेकडील अरुंद पट्टीस कोंकण ह्मणतात.

१८ **कोरींव लेणीं**:—डोंगर पोखरून त्यांतील दगडांत कोरलेल्या इमारती, देवळें वगैरे नकशीदार कामास कोरींव लेणीं ह्मणतात.

१९ **खरीपाचीं पिकें**:—पावसाळ्यांत होणारीं पिकें.

२० **खाडी**:—नदीचें मुख समुद्राच्या भरतीचें पाणी आंत घेण्याजोगे रुंद असल्यास त्यास खाडी ह्मणतात.

२१ **खिंड**:–पर्वत व डोंगर यांच्या मधील सखल प्रदेशास खिंड ह्मणतात.

२२ **खेडेंगांव**:–लहान गांवास ह्मणतात.

२३ **खोरें**:–डोंगरांच्या रांगांमध्यें जो खोल प्रदेश असतो त्यास **खोरें** ह्मणतात.

२४ **खंदक**:–किल्लयासभोंवतीं खोल पण अरुंद अशी जमीन खणतात, त्यांत पावसाळ्यांत पाणी सांचतें, अशा खणलेल्या भागास '**खंदक**' ह्मणतात.

२५ **गांव**:–जेथें १००० ते ४००० पर्यंत मनुष्य वस्ती असतें, असें ठिकाण.

२६ **गांवठाण**:—गांवांत मनुष्यवस्ती असलेली जी हद्द तीस **गांवठाण** ह्मणतात.

२७ **गुहा**:—डोंगरामध्यें खोलगट असलेल्या घळीस किंवा भेगेस **गुहा** ह्मणतात.

२८ **गोदी**-[ डॉक ]-बंदरांत समुद्र किनाऱ्यास धक्का बांधून आगबोटी थांबविण्याकरितां जी जागा केलेली असते, तीस **गोदी** किंवा **डॉक** ह्मणतात.

२९ **घांट**:—डोंगरावरून जाण्या येण्याकरितां जे रस्ते केलेले असतात, त्यास '**घांट**' ह्मणतात.

३० **घांट** [ नदीचा ] नदीच्या कडेला दगडी पायऱ्या बांधतात त्यास नदीचा **घांट** ह्मणतात.

३१ **जहागिर**:–सरदाराकडे तोडून दिलेला प्रदेश.

३२ **जिल्हा**:–अनेक तालुके मिळून होणारा भाग.

३३ **जंगल**:–मनुष्यवस्ती नसलेलें अरण्य.

३४ **जंक्शन स्टेशन**:—आगगाडीचे अनेक फांटे मिळणारें स्टेशन.

३५ **झरा**:—पाण्याचा प्रवाह जमिनींतून आपोआप सुरू होतो, तें ठिकाण.

३६ **टेंकडी**:—जमिनीच्या उंचवट्यास **टेंकडी** ह्मणतात.

३७ **डोंगर**:—फार मोठी टेंकडी

३८ **डोह**:—नदींत किंवा खाडींत जेथें पाणी फार खोल असतें, त्या ठिकाणास डोह ह्मणतात.

३९ **तळें [ तलाव ]**:—चारी बाजूंनीं जमीन असून मध्यें जो पाण्याचा सांठा असतो, त्यांस ‘ **तळें** ’ ह्मणतात.

४० **तालुका**:—अनेक गांवें मिळून होणारा जिल्ह्याचा जो भाग त्यास **तालुका** ह्मणतात.

४१ **दरा ( दरी )**:—दोन डोंगरामधील लहान व चिंचोळया भागास ‘ **दरा** ’ ह्मणतात.

४२ **दलदल**:—नदी व खाडी यांच्या कांठाला असलेली पाणथळ जागा.

४३ **दिशा**:—ह्मणजे बाजू. **मुख्य दिशा** पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर. **उपदिशा** ईशान्य, आग्नेय, नैऋत्य, वायव्य. सूर्य उगवतो ती **पूर्व**, मावळतो ती **पश्चिम**. नकाशांत वरची बाजू **उत्तर**, खालची **दक्षिण**, उजव्या हाताकडील **पूर्व** व डावेकडील **पश्चिम**.

४४ **द्वीपकल्प**:—ज्या प्रदेशाच्या तिन्ही बाजूकडून पाणी असून चौथी बाजू जमिनीशीं जोडलेली असते; त्यास ‘ **द्वीपकल्प** ’ ह्मणतात.

४५ **दीपगृह**:-( लाइट हौस ):–समुद्र किनाऱ्यास, कांहीं बंदरांत जहाजांना 'हें बंदर आहे' असें सुचविणारे; व खडक सुचविण्याकरितां खडकावर उंच मनोऱ्याप्रमाणें इमारत बांधून वर फिरता दिवा ठेवितात; त्यास 'दीपगृह' ह्मणतात.

४६ **दुआब**:–दोन नद्यांमधील प्रदेश.

४७ **देवस्थान**:–हिंदु देवालय व त्याच्या खर्चाकरितां तोडून दिलेलें उत्पन्न. यांस देवस्थान ह्मणतात.

४८ **देश**:—सह्याद्रीच्या पूर्वेकडील प्रदेशास **देश** ह्मणतात.

४९ **धरण**:—कांहीं नद्यांना धक्के बांधून पाणी अडवून ठेविलेलें असतें, त्यास **धरण** ह्मणतात

५० **धबधबा**:–नदीचा प्रवाह डोंगरांतील उंच कड्यावरून एकदम खालीं कोसळतो; अशा ठिकाणास **धबधबा** ह्मणतात.

५१ **नकाशा**:–पृथ्वीचा किंवा पृथ्वीवरील कोणत्याही भागाचा कागदावर प्रमाणांत काढलेल्या आकृतीस '**नकाशा**' ह्मणतात.

५२ **नदी**:–पर्वत, डोंगर, किंवा सरोवर यापासून गोड्या पाण्याचा प्रवाह निघून उतार जमिनीकडे वाहात जातो, त्यास **नदी** ह्मणतात.

५३ **निर्यात माल**:—परदेशीं जाणाऱ्या मालास '**निर्यात माल**' ह्मणतात.

५४ **पक्का माल**:—कच्च्या मालापासून कृतीनें तयार केलेला उपयुक्त माल; उदा०—कापड, भांडीं, साखर, तूप.

५५ **पठार**:—डोंगरावरील मैदान, किंवा उंच मैदान.

५६ **प्रवाह [नदीचा]** याचे ३ प्रकार आहेत. १ **पूर्व-प्रवाह**-उगमा जवळचा भाग. २ **मध्यप्रवाह**-मधील प्रवाह; ३ **उत्तर-प्रवाह**-मुखाकडील भाग.

५७ **पर्वतः**—डोंगर फार मोठा व उंच असून तो लांबवर पसरलेला असल्यास त्यास **पर्वत** ह्मणतात.

५८ **पर्वतांच्या रांगाः**—डोंगर किंवा पर्वत तळाशीं लागून असतात, त्यास '**पर्वतांच्या रांगा**' ह्मणतात.

५९ **पाणलोटः**—ज्या उंच मैदानांतून पाणी चोहोंकडे जातें, त्यास **पाणलोट** ह्मणतात.

६० **पात्र [नदीचें]**.-नदीच्या दोन्ही कडांमधील प्रवा-हाचा भाग.

६१ **बेटः**—सर्व बाजूंनीं पाणी असून मध्यें जमीन असतें, त्यास **बेट** ह्मणतात.

६२ **बोगदाः**—आगगाडी जाण्या येण्याकरितां डोंगर पोंख-रून जो रस्ता करितात त्यास '**बोगदा**' ह्मणतात.

६३ **बंदरः**—समुद्र किनाऱ्यास आगबोटी थांबविण्याकरितां केलेली सोईची जागा.

६४ **भरतीः**—समुद्राचें पाणी चढतें त्यास '**भरती**' ह्मणतात.

६५ **भूशिरः**— [भूशलाका, केप]. जमिनीचा चिंचोळा भाग समुद्रांत गेलेला असतो त्याला '**भूशिर**' ह्मणतात.

६६ **महाल [पेटा]**-तालुका मोठा असल्यास त्याचा निराळा भाग करितात त्यास महाल ह्मणतात. महालावरील अधिकाऱ्यास '**महालकरी**' ह्मणतात.

६७ **महासागर**:--पृथ्वीवरील खाऱ्या पाण्याचे ५ भाग मानिले. आहेत; त्या प्रत्येकास '**महासागर**' असें ह्मणतात. ते असेः—पॅसिफिक, अटलांटिक, उत्तर, दक्षिण व हिंदी महासागर.

६८ **मान्सून वारे**:--नियमितपणें वाहणारे हंगामी वारे.

६९ **माळ**:--गांवठाणाबाहेरील मोकळा सपाट प्रदेश.

७० **मिठागर**:--मीठ पिकविण्याचा कारखाना. उरण, कुरलें, पेण, वसई, येथें मिठागरें आहेत.

७१ **मुख**:--नदी ज्या ठिकाणीं समुद्रास किंवा सरोवरास मिळते; त्या जागेस '**नदीचें मुख**' ह्मणतात.

७२ **म्युनिसिपालिटी**:--शहरची व्यवस्था पाहणारी कमेटी किंवा मंडळी.

७३ **मैदान**:—दरा मोठा व सपाट असल्यास त्यास '**मैदान**' ह्मणतात. किंवा सपाट जमिनीचा मोठा प्रदेश.

७४ **मृगजल**:—सूर्याच्या उष्णतेनें मैदानांतील जमीन तापून त्या ठिकाणीं नदी किंवा सरोवर आहे असा भास होणें; ह्या चमत्कारास '**मृगजल**' असें ह्मणतात.

७५ **रब्बीचीं पिकें**:—थंडीच्या दिवसांत होणारीं पिकें.

७६ **रेल्वे**:—लोखंडी रुळाचा आगगाड्या जाणारा रस्ता.

७७ **लोकलबोर्ड**:—लोकल फंडाच्या उत्पन्नांतून लोकहिताचीं कृत्यें [ उदा०—शिक्षण, दवाखाने, रस्ते, कालवे वगैरे कामें ]. करणारी मंडळी.

७८ **शहर**:—पुष्कळ वस्ती असलेलें मोठें गांव.

७९ **शिखरः**—पर्वत किंवा डोंगर यांच्या माथ्यास '**शिखर**' ह्मणतात.

८० **स्टेशनः**—उतारू व माल चढण्याउतरण्याकरितां आगगाडी थांबण्याचें ठिकाण.

८१ **सखल प्रदेशः**—समुद्र सपाटी पेक्षां फार उंच नसलेला प्रदेश.

८२ **समुद्रः**—खाऱ्या पाण्यानें भरलेल्या फार मोठ्या खळग्यास '**समुद्र**' ह्मणतात.

८३ **सरोवरः**—फार मोठें तळें.

८४ **संगमः**-एक नदी दुसऱ्या नदीला ज्या ठिकाणीं मिळतें त्या ठिकाणास '**संगम**' ह्मणतात.

८५ **संयोगि भूमीः**—दोन जमिनीस जोडणारा जमिनीच्या भागास '**संयोगि भूमी**' ह्मणतात.

८६ **संस्थानः**—मुख्य राजाच्या अंमलाखालीं व कांहीं अंशी स्वतंत्र असणाऱ्या लहानशा राज्यास '**संस्थान**' ह्मणतात.

८७ **स्वाभाविक विभागः**—प्रदेशाची उंची, जमिनीचें स्वरूप यांच्या अनुरोधानें व डोंगर, नदी अगर समुद्र किनारा यांनीं मर्यादित, असा भूप्रदेश. याला "**स्वाभाविक विभाग**" ह्मणतात.

८८ **स्थानिक स्वराज्यः**—एकाद्या प्रदेशाची अंतर व्यवस्था तेथील 'लोकानियुक्त मंडळ्या'वर सोंपविलेली असते; अशा व्यवस्थेस '**स्थानिक स्वराज्य**' ह्मणतात. उ. म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें.

८९ **स्केलः**—[ प्रमाण ]-मोठ्या प्रदेशाचा नकाशा लहानशा कागदावर ज्या प्रमाणानें काढलेला असतो, त्यास '**स्केल**' ह्मणतात.

९० **सेक्रेटरीएटः**—गव्हर्नर साहेबांच्या सेक्रेटरींचे सरकारी ऑफीस.

९१ **हवामानः**—एकाद्या प्रदेशाचें सरासरी उष्णतामान.

९२ **क्षेत्रः** नदीच्या कांठीं अगर संगमावर देवस्थान असलेल्या गांवास अगर पवित्र स्थलास ' क्षेत्र ' ह्मणतात.

९३ **समुद्र व जमीन यांतील विरोधः**—

१ बेट-उलट-सरोवर. २ आखात-द्वीपकल्प. ३ खाडी-भूशिर. ४ सामुद्रधुनी-संयोगिभूमि.

९४ **कारखाने कोठें निघतातः**—कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा. वाहतुकीचीं साधनें, श्रीमंत धाडशी व्यापारी जेथें आहेत तेथें कारखाने निघतात.

९५ **समुद्राचें पाणी खारें कां?**—नद्यांतून थोडा थोडा क्षारमय पदार्थ समुद्रांत येतो. व समुद्राच्या पाण्याची वाफ होऊन गाळ तसाच सांचून राहतो. हजारों वर्षें असा क्रम चालल्यानें समुद्राचें पाणी खारट झालें आहे.

९६ **नद्यांची तुलनाः**—लांबी, वाहण्याची दिशा, प्रवाहाचा जोर, कालवे, जलमार्ग, पिकें.

९७ **पर्वतांची तुलनाः**—उंची, लांबी, दिशा, नद्यांचे उगम, त्यांच्या दिशा, खनिज पदार्थ, वनस्पति, प्राणी.

९८ **हवामानाची तुलनाः**—प्रदेशाचें स्वरूप, समुद्र-सांन्निध्य, समुद्रसपाटीपासून उंची, वारे, दक्षिणोत्तर अंतर.

९९ **भूप्रदेशाची तुलनाः**—प्रदेशाचें स्वरूप, पर्वत, नद्या, आकार, उत्पन्न, धंदे, सुपीकपणा वगैरे.

**१०० देश व कोंकण यांची तुलनाः—**

| तुलना | देश | कोंकण. |
|---|---|---|
| १ प्रदेश— | उंचवट्याचा. | सखल. |
| २ स्वरूप— | प्रदेश अरुंद. | पठाराचा प्रदेश. |
| ३ उतार— | पूर्वेकडे. | पश्चिमेकडे. |
| ४ नद्या— | फार आहेत; जास्त लांब आहेत; जास्त उपयुक्त आहेत. | कमी आहेत. लांबीनें कमी आहेत. उपयुक्तता कमी. |
| ५ हवा— | विषम, व उष्ण. | सम व दमट. |
| ६ पाऊस— | कमी. | फार. |
| ७ पिकें— | कापूस, ज्वारी इत्यादि. | तांदूळ, नारळ इत्यादि. |
| ८ भाषा— | मराठी. | मराठी. |

## उपयोग.

**१०१ आखातें, भूशिरें वगैरे यांचा उपयोगः**—१ किनाऱ्यास खांडी असल्यानें दळण वळण करणें सोईचें असतें. २ चांगलीं बंदरें होतात.

**१०२ आगगाड्याः**—१ मनुष्ये व माल यांची त्वरित नेआण होते. २ दुष्काळी प्रदेशांत साधनसामुग्री पाठवितां येतें. ३ युद्ध, बंडें, व दंगे याप्रसंगीं सैन्य पाठवितां येतें. ४ भिन्न प्रदेशांत दळण वळण वाढतें. ५ व्यापार वाढतो.

डा गो

१०३ **कालवे**:—धरणें-पाटबंधारे-शेतीस व पिण्यास पाण्याचा पुरवठा होतो.

१०४ **किल्ला**:—शत्रूंपासून प्रदेशाचें संरक्षण करितां येतें.

१०५ **खाडी**:—(१) होड्या व गलबतें दूरवर नेतां येतात. (२) गलबतांना आश्रयास निवाऱ्याचें स्थान मिळतें. (३) खारे मासे मिळतात.

१०६ **गोदी**:—जहाजांवर माल चढवितां उतरवितां येतो.

१०७ **घांट**:—डोंगराळ प्रदेशांत दळणवळण करणें सोईचें असतें.

१०८ **जंगल**:—१ इमारतीचीं व जळाऊ लांकडें मिळतात. २ हिरडा, लाख, शिकीकाई वगैरे उद्भिज्ज पदार्थ मिळतात. ३ पाऊस पडतो. ४ पाणी जमिनींत मुरतें.

१०९ **डोंगर, पर्वत**:—१ लांकूड मिळतें. २ सरहद्द ठरविणें सोईचें असते. ३ पावसानें डोंगर झिजून मैदानावर सुपीक जमिनी तयार होतात. ४ माथा सपाट थंड असल्यास लोक उत्तम हवेसाठीं येऊन राहातात. ५ शिखरें ढगांना आडवून पाऊस पाडतात. ६ नद्या उत्पन्न होतात. ७ इमारतीचे दगड व खनिज संपत्ति मिळते. ८ वारे अडविले असतात. ९ शत्रू येण्यास प्रतिबंध होतो. १० लोक कंटक होतात.

११० **दऱ्या, खोरीं, गुहा वगैरे**:—१ सृष्टिसौंदर्य पाहतां येतें. २ पाणी सांचून झरे उत्पन्न होतात. २ झाडी उत्पन्न होते.

१११ **दिशा**:—प्रदेशांतील वेगवेगळया स्थानांची जागा नक्की समजते.

११२ **धबधबा**:—१ पाण्याच्या जोरावर वीज उत्पन्न करून गिरण्या व कारखाने चालवितां येतात.

११३ **नकाशा**:—१ भूगोल विषयक ज्ञान होतें. २ प्रवासास मदत होते. ३ न पाहिलेल्या प्रदेशाची बरीच कल्पना होते.

११४ **पठार**:—१ हवा थंड व स्वच्छ असते. २ वसाहतीस उत्तम.

११५ **नद्या-सरोवरें**:—१ पाणी पिण्याच्या व शेतीच्या उपयोगी पडतें. २ कालवे काढतां येतात. ३ जलमार्ग उपयोगी पडतो. ४ व्यापार चालतो. ५ सरहद्द ठरवितां येते. ६ कांठांस गाळाच्या सुपीक जमिनी तयार होतात. ७ कांठीं गांवें वसविणें सोईचें असतें. ८ दाट झाडी तयार होते. ९ नळानें शहरांत पाण्याचा पुरवठा करितां येतो. १० मासे मिळतात.

११६ **बेट**:—१ बेटावरील लोक दर्यावर्दीपणांत हुशार होतात. २ दीपगृहें बांधतां येतात. ३ दळण वळण वाढतें. ४ किल्ले बांधतां येतात.

११७ **दीपगृहें**:—जलमार्गांत असलेल्या जहाजांना ठिकाण समजतें.

११८ **बंदर व समुद्र किनारा**:—१ जहाजें सुरक्षित राहतात. २ जलमार्गानें दळण वळण होऊन व्यापार वाढतो. ३ जलमार्ग कमी खर्चाचा असतो.

११९ **भूशिर**:—१ दीपगृह बांधतां येतें. २ बंदरें होतात.

१२० **मैदान**:—१ गांवें वसतात. २ शेतकी करून धान्य पिकवितां येतें.

# विल्हेवारी.

खालील स्थलें काय आहेत, कोठें आहेत, व कशाकरितां प्रसिद्ध आहेत तें सांगा:-

अक्कलकोट, अकोलें, अजिमतारा, अजिंठा, अथणी, अपरसिंधफ्रँटियर, अबू, अमरकंटक, अरबीसमुद्र, अरवली, अलिबाग, अहमदाबाद, अहमदनगर, अंकोला, अंबा, अंमळनेर, आगाशी, आळंदी, आंबेगांव, इगतपुरी, इचलकरंजी, ईदर, इलकल, इंडी, इंदापूर, इंद्रायणी, उत्तरभाग, उंबरगांव, उमरकोट, उरण, एदलाबाद, एरंडोल, औदुंबर, औंध, औरंगाबाद, कच्छ, कर्जत, कर्नाटक, करजगी, करगची, कल्याण, कलघटगी, कळवण, कळसूबाई, कागल, काठेवाड, कादवा, कानेरी, कार्ले, कारवार, किर्लोस्करवाडी, कुंडलिका, कुंभार्ली, कुमठें, कुरुंदवाड, कुलाबा, कोंकण, कोड, कोपरगांव, कोयना, कोरेगांव, कोल्हापूर, क्वेटा, कृष्णा, खटाव, खडकी, खर्डें, खानदेश, खानापूर, खाराघोडा, खालापूर, खिरथर, खेड, खेडा, खैरपूर, खंडाळें, खंबायत, गदग, गाणगापूर, गिरणा, गिरनार, गिरसप्पा, गुहागर, गोकर्णमहाबळेश्वर, गोकाक, गोंडळ, गोदावरी, गोवें, घोघो, घटप्रभा, घारापुरी, चंदगड, चंद्रभागा, चांदवड, चाळिसगांव, चिकोडी, चिंचवड, चिपळूण, चोपडें, जत, जबलपूर, जमाखिंडी, जव्हार, जळगांव, जंजीरा, जाकोबाबाद, जाफराबाद, जामखेड, जामनेर, जावली, जुन्नर, जुनागड, जेजुरी, जोधपूर, ठाणें, डहाणू, डाकूर, डांगदेश, त्र्यंबकेश्वर, तळेगांव, तळोदें, तान्सा, तापी, तालीकोट, तासगांव, तिनैघाट, तुंगभद्रा, तुळशी, तोरणा, थरपारकर, थळघाट, दमण, दक्षिणभाग, दक्षिणमहाराष्ट्र, द्वारका, दांटा, दापोली, दारणा, दिंडोरी, दीव, देवगड, देहू, दौंड, दौलताबाद, धरमपूर, धारवाड, धुळें, धोम, ध्रांगध्रा, नगर, नडियाद, नंदुरबार, नवाबशाह, नर्मदा, नरगुंद, नरसोबावाडी नवलगुंद, नवानगर, नवापूर, नहर, नागोठाणें, नांदगांव, नासिक, निपाणी, निफाड, निर्मळ, निरा, निरानरसिंगपूर, नेरळ, नेवासें, पनवेल, प्रतापगड, प्रवरा, परशराम, परसगड, परळी, पंचमहाल, पंचवटी, पंजाब, पंढरपूर, पाचोरें, पाटण, पारनेर, पारोळें, पालनपूर, पांचगणी, पांझरा, पिंपळनेर, पुणें, पुणतांबें, पूर्णा, पुरंदर, पेठ, पेण, पोरबंदर, फलटण, फैजपूर, फोंडाघाट, बंकापूर, बडोदें, बदामी,

बलुचिस्तान, बागलाण, बागलकोट, बागेवाडी, बाणकोट, बारडोली, बार्शी, बारामती, बावडें, बिकानेर, बिळगी, बुधगांव, बेळगांव, बैतूल, बोरघांट, बोरी, बोलन, भगूर, भटकळ, भडगांव, भडोच, भावनगर, भीमथडी, भीमा, भीमाशंकर, भिवंडी, भिलवडी, भूज, भुसावळ, भोर, मनमाड, मंचर, मंडणगड, मच्छलीपट्टण, मद्रास, मध्यप्रांत, मध्यभाग, मलप्रभा, महाड, महाबळेश्वर, महाराष्ट्र, मही, महीकांठा, म्हैसूर, मांझ, माथेरान, मांडवी, माढें, माण, माणगांव, मारवाड, मालकमपेठ, मालेगांव, मालवण, मावळ, माहीम, माळवा, मियानी, मिरज, मुगद, मुचकुंदी, मुंडर्गी, मुद्देबिहाळ, मुधोळ, मुंबई, मुरगोड, मुरबाड, मुरूड, मुळशी, मुळामुठा, मेवासी, मोखाडा, मोरवी, मोसम, यल्लापूर, यावल, येवलें, रत्नागिरी, राजकोट, राजपिंपळा, राजपुताना, राजमहेंद्री, राजापूर, राणेबेन्नूर, राधनपूर, रामदुर्ग, रायगड, रायचूर, रावेर, राहुरी, रेवदंडा, रेवा, रेवाकांठा, रोण, रोहें, लारखाना, लुनी, लोंढा, लोणावळें, वज्रेश्वरी, वढवाण, वर्धा, वऱ्हाड, वसई, वांई, वाडें, वांद्रे, वारणा, वासिष्टी, वासदा, वाळवें, विजयदुर्ग, विजयानगर, विजापूर, विंध्य, विशाळगड, विहाड, वेंगुर्लें, वेणा, वेरूळा, वेटास, वैतर्णा, शंभूमहादेव, शरावती, शहादे, शहापूर, शास्त्री, शिकारपूर, शिरशी, शिरपूर, शिगांव, शिरूर, शिवनेरी, शेवगांव, श्रीगोंदें, सकर, संकेश्वर, संगमनेर, संगमेश्वर, सचीन, सज्जनगड, सप्तशृंग, सपगांव, सह्याद्रि, सांगली, सातपुडा, सातमाळा, सातारा, साबरमती, सावनूर, सावंतवाडी, सावित्री, साष्टी, शिंदखेडे, शिंदगी, सिद्धापूर, सिंधु, सिंधुदुर्ग, सिन्नर, सिना, सिंहगड, सुरगणा, सुरत, सुवर्णदुर्ग, सोमनाथ, सोलापूर, सौंदत्ती, हर्णै, हरिश्चंद्रगड, हल्याळ, हवेली, हानगल, हाला, हिंगणें, हुकेरी, हुडगी, हूनगुंद, हुबळी, हैदराबाद, होनावर.

2550

**मुंबई शहर**:–हें या इलाख्याची राजधानीं आहे. जगांतील उत्तम बंदरांत याची गणना होते; वस्ती १० लाखांच्या वर आहे. जगांतील सर्व राष्ट्रांतील जहाजें मुंबई बंदरांत गजबजलेलीं दिसून येतात. या शहराची लांबी १२ मैल व रुंदी ३ मैल आहे. आगगाडीचे दोन फांटे या शहरांतून गेले असून आगगाड्या सारख्या धांवत असतात. या शिवाय विजेनें चालणाऱ्या ट्राम गाड्या व मोटारी यांची सतत रहदारी असते, रस्ते रुंद असून ते नेहमीं गजबजलेले असतात, शहरांतील भव्य इमारती पाहून मन आश्चर्यानें थक्क होतें. ठाणे जिल्ह्यांत मुद्दाम तलाव बांधून तेथून नळ टाकून मुंबई शहरांत पाण्याचा पुरवठा केला आहे. येथें गिरण्या व कारखाने पुष्कळ असून त्यांतून लाखों मजूर काम करितात; तसेंच श्रीमंत व्यापाऱ्यांच्या पेढ्या ही पुष्कळ आहेत. 'कोटे' ह्मणून जो भाग आहे तेथें सरकारी ऑफीसें व युरोपियन कंपन्याचीं दुकानें आहेत. मलबार टेकडीवर गव्हर्नर साहेबांचा बंगला आहे. मुंबईची म्युनिसिपालिटी अतिशय संपन्न असून तीस "कार्पोरेशन" असें ह्मणतात. मुंबईतील प्रेक्षणीय स्थळें–राजाबाई टावर (मनोरा), टांकसाळ, सेक्रेटरीएट, हायकोर्ट, राणीचा बाग, पोष्ट ऑफीस, बोरीबंदर स्टेशन, मलबार हिल, बॅकबे, क्राफर्ड मार्केट, अपालो बंदर, ग्रँट मेडिकल कॉलेज, ताजमहाल हॉटेल, मोठमोठ्या गिरण्या वगैरे.

शालोपयोगी ] **संग्राह्य पुस्तकें !!!** [ परीक्षोपयोगी

**कागद उंची, सुंदर छपाई, मनोहर बांधणी, प्रती थोड्या !**

**लेखक— केशव रामचंद्र कुलकर्णी, हे. मा. म. शा. नं. ३ बेळगांव.**

१ **ईशस्तवन-संग्रह** (किं. १ आणा):— यांत प्रार्थनापर, स्वागतपर, राजस्तव, देशस्तव, राष्ट्रगीत वगैरे पद्यांचा सुंदर संग्रह आहे. बरींच गोड पद्ये संगीत चाल्रीवर रचिलीं आहेत. हें पुस्तक शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना अतिशय आवडलेलें आहे. प्रती थोड्याच शिल्लक आहेत. त्वरित मागणी करा. पुढच्या आवृत्तीकरितां पद्ये व संवाद पाठवा. लेखकांच्या नांवांसिह छापू.

२ **मानाजीराव नाटक** (किं. ४ आणे)— एक अंकी सुंदर नवरसयुक्त नाटक! ह्यांत स्त्रीपात्र नाहीं. संमेलनप्रसंगीं करितां येतें. विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनाची करमणूक करून मनास इष्ट दिशा लावणें, हेंच ह्या नाटकाचें वैशिष्ट्य होय!! पुस्तक सर्वांगसुंदर आहे. विषय उदात्त व गंभीर असूनहि हसतां हसतां मुरकुंडी वळते.

३ **महाराष्ट्राचा प्रश्नोत्तर इतिहास** [किं. २ आणे]— यांत महाराष्ट्राच्या इतिहासांतील सर्व प्रसंगांचें प्रश्नोत्तर सोप्या भाषेत विवरण असल्यानें ह्या पुस्तकावरून **चौथीची** तयारी अवघ्या दोनच महिन्यांत होते.

४ **सुलभ मराठी व्याकरण** (किं. २ आणे):— यांत **चौथीच्या** व्याकरण विषयाची मुद्देसूद तात्विक माहिती असून ग्रंथावरून व्याकरण सांगण्याची तयारी अवघ्या एकच महिन्यांत उत्तम होते

५ **सुलभ तोंडी हिशेब**:— इयत्ता २ ते ५ करितां (किं. १ आणा). यांत चालींची उपपत्ति सरळ व सुबोध भाषेत असल्यानें ह्या पुस्तकाच्या साह्यानें कसलेहि तोंडी हिशेब जलद करितां येतात.

**सूचना**—सर्वांस ट. ख. वेगळा. किरकोळ प्रतीस किंमतीपेक्षां ०॥ ची तिकिटें जास्त पाठवावीं, घाऊक कमिशन २५ टक्के देऊं. तरी ग्राहक, एजंट व बुकसेलर ह्यांनीं त्वरा करावी.

## आजच पत्र लिहा.

पत्ते—

(१) **केशव रामचंद्र कुलकर्णी, आलासकर**
हेडमास्तर, मराठी शाळा नं. ३ बेळगांव.

(२) खडेबाजार ३१५६ बेळगांव.

REFBK 0002640

REFBK-0002640